**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार, दिनांक २२ मे २०२४**

**ठळक बातम्या**

1. **उद्या साजऱ्या होणारा बुद्ध पौर्णिमेनिमित्त नागपूर आणि परिसरात विविध कार्यक्रमाचे आयोजन.**
2. **नागपूरच्या एनसीसी अधिकारी प्रशिक्षण अकादमी मध्ये कॅडेट ट्रेनिंग ऑफिसर्सची पासिंग आउट परेड संपन्न.**
3. **शहरी जैवविविधता निर्देशांक निर्मितीची सुरुवात नागपूर पासून व्हावी - प्रधान वन संरक्षण शैलेश टेंभुर्णीकर यांचे जैव विविधता दिनानिमित्त कार्यक्रमात प्रतिपादन.**
4. **महाविरणद्वारे नागपूर आणि वर्धा शहरांत स्मार्ट मीटर्स बसविणे सुरु.**

*****

## बुद्ध जयंती

संपूर्ण मानव जातीला विश्वशांतीचा संदेश देणारे भगवान गौतम बुद्ध यांची जयंती उद्या बुद्ध पौर्णिमा म्हणून साजरी केली जात आहे या निमित्त नागपूर तसेच परिसरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेडॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती आणि बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर बुद्धिस्ट सेमिनरी उंटखाना यांच्या संयुक्त विद्यमानं उद्या 23 मे रोजी साजऱ्या होणाऱ्या 2 हजार 568व्या बुद्ध जयंती निमित्त तीन दिवसीय बुद्ध महोत्सव 23 ते 25 मे दरम्यान दीक्षाभूमीवर आयोजित करण्यात आला आहे. उद्या सायंकाळी 6 वाजता शंभर बालकांना श्रामणेर दीक्षा दिली जाईल, अशी माहिती स्मारक समितीचे अध्यक्ष भदन्त आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांनी दिली आहे. नागपूर उमरेड मार्गावरील बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय धम्म अकादमी राजुरवाडी येथे उद्या सकाळी दहा वाजता अष्टशील उपसोथ ग्रहणाचा कार्यक्रम आयोजित केला असून सायंकाळी सात ते दहा या दरम्यान भारतीय प्रशासकीय सेवेतील निवृत्त अधिकारी शाम तागडे यांचे धम्म प्रबोधन होणार आहे. उद्या सकाळी ५ वाजता अमरावतीच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर संस्कार भवन भीम टेकडी येथे बुद्ध पहाट चे आयोजन संबोधी: डॉ आंबेडकर स्टडी सर्कल व डॉ.बाबासाहेब आंबेडकर महिला प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. या बुद्ध पहाट चे संगीत संयोजन सागमप संगीत ॲकॉडमीने केले आहे.

## प्राणी गणना

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या 'बफर झोन'मध्ये उद्या गुरुवार, २३ मे रोजी बुद्ध पौर्णिमेला चंद्राच्या लख्ख प्रकाशात ८९ मचाणांवरून प्राणी गणना केली जाणार आहे. 'निसर्ग अनुभव' या गोंडस नावाने दरवर्षी हा उपक्रम राबवला जातो. एका मचाणवर दोन निसर्गप्रेमींना साडेचार हजार रुपये शुल्क आकारून रात्रभर मुक्कामाची संधी दिली जाते. निसर्ग अनुभवासाठी निसर्गप्रेमींकडून या सर्व मचाणांची नोंदणी पूर्ण झालेली आहे.

## एनसीसी पासिंग आउट परेड

एनसीसी ऑफिसर्स ट्रेनिंग अकादमी, कामठीचे कमांडंट, मेजर जनरल के.जे.एस. राठोड यांनी, नॅशनल कॅडेट कॉर्प्स (NCC) कनिष्ठ विभागाच्या पासिंग आऊट परेडची मानवंदना स्वीकारली. यावेळी 57 थर्ड ऑफिसर्स, 410 आर्मी कॅडेट ट्रेनिंग ऑफिसर आणि एनसीसीच्या 17 संचालनालयाच्या 45 नेव्हल कॅडेट ट्रेनिंग ऑफिसर्सनी अतिशय स्फूर्तीने मार्शल धून वाजवली. कॅडेट प्रशिक्षण अधिकारी हे भारतातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधित्व करणारे शालेय शिक्षक असून राष्ट्रीय कॅडेट कॉर्प्सचे ब्रीदवाक्य "शिस्त आणि एकता" हे या परेडचे प्रतीक आहे. परेडचे नेतृत्व आंध्र प्रदेश आणि तेलंगणा संचालनालयाचे अधिकारी सुरेश मालसेट्टी यांच्या नेतृत्वाखालील अकादमीने केले होते. हा अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यावर कॅडेट प्रशिक्षण अधिकाऱ्यांनी त्यांचे NCC कमिशन प्राप्त केलं आणि ते सहयोगी NCC अधिकारी (ANOs) बनले. आर्मी सीटीओमध्ये प्रथम स्थान मिळविल्याबद्दल नवीन सिंग राघव यांना कमांडंटचे सुवर्णपदक आणि महासंचालक बॅटन प्रदान करण्यात आला तर नौदल प्रशिक्षणार्थींमध्ये सीटीओ परब नरेंद्र कानोबा यांना कमांडंटचे सुवर्णपदक आणि महासंचालक बॅटन प्रदान करण्यात आला. इंटर-कंपनी करंडक महासंचालक बॅनर शिवाजी कंपनीने जिंकला. या कार्यक्रमाला वरिष्ठ अधिकारी, मान्यवर आणि प्रशिक्षणार्थींचे कुटुंबीय उपस्थित होते.

## पुणे-कार अपघात

पुणेकार अपघात प्रकरणातल्या अल्पवयीन मुलांना मद्य पुरवल्याप्रकरणी पुणे शहरातले हॉटेल,ट्रिलियन सिक्युरिटी प्रायव्हेट लिमिटेड,आणि पंचशील इन्फ्रास्ट्रक्चर मॅरियट सूट-ब्लॅक, या दोन्ही हॉटेल आणि परमिट रूम, तसंच पबचे आस्थापनाविषयक व्यवहार,राज्य उत्पादन शुल्क विभागाने तात्काळ प्रभावाने बंदकेले आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वतीनं पुणे शहरातल्या सर्व पब्ससह इतर परमिटरूमची विशेष तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे. परवानाधारक हॉटेल,पबमध्ये अल्पवयीन मुलांना कोणत्याही विदेशी मद्याची विक्री करण्यात येवू नये, मध्यरात्रीदीड वाजेनंतर कोणत्याही विदेशी मद्याची विक्री करण्यात येवू नये, महिला वेटर्समार्फत रात्री साडे नऊ नंतर कोणतीही विदेशीदारू पुरवू नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. दरम्यान शिवाजीनगर न्यायालयामधील पॉस्को कोर्टसमोर दोनी बाजूचा युक्तिवाद झाला असुन अल्पवयीन आरोपीचे वडील विशाल अग्रवाल ला 24 मे पर्यंत पोलीस कोठडी दिली आहे.

## खत पुरुवठयाचं नियोजन

राज्यात यंदा खरीप हंगामात ४८ लाख टन खत पुरुवठयाचं नियोजन प्रस्तावित करण्यात आलं आहे. त्यामध्ये महाराष्ट्रासाठी ४५ लाख ५३ हजार टन खत पुरवठयाचं नियोजन मंजूर केलं आहे. तसंच युरिया आणि डीएपी या खतांचा संरक्षित साठा

करण्याचा निर्णय शासनानं घेतला असून, या खतांच्या किंमतीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. त्यामुळे युरिया खताच्या ४५ किलो गोणीची किंमत २६६ रूपये ५० पसै असल्याची माहिती कृषी संचालक विकास पाटील यांनी दिली.

## आंतरराष्ट्रीय जैव विविधता दिन

जैवविविधतेचे केंद्र म्हणून नागपुरची ओळख असून शहारातील जैवविविधता संवर्धन आणि संरक्षणासाठी महानगरपालिकेने जैवविविधता निर्देशांक तयार करून राज्यातील या उपक्रमाची सुरुवात करावी, अशी सूचना आज प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा वनबल प्रमुख शैलेश टेंभुर्णीकर यांनी केली. तसेच, नागपूर जिल्ह्यातील विविध तलाव चिन्हीत करून जैवविविधता संवर्धनाच्या दिशेने कार्य व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाने नागपूरच्या चिटणवीस सेंटरच्या टॅमरिंड सभागृहात आंतरराष्ट्रीय जैवविविधता दिनानिमित्त आयोजित केलेल्या राज्यस्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी टेंभुर्णीकर बोलत होते. नागपूर शहराच्या सभोवताली सेमिनरी हिल, गोरेवाडा आणि अंबाझरी तलाव भागात मोठया प्रमाणात जैवविविधता आढळून येत असल्याने जैवविविधतेचे केंद्र म्हणून नागपूर शहराची ओळख आहे. जैवविविधता संवर्धन व संरक्षणासाठी राज्य जैवविविधता मंडळाच्या उपक्रमांतर्गत महानगर पालिकेद्वारे शहर जैवविविधता निर्देशांक तयार करून राज्यात या उपक्रमाचा प्रारंभ करावा,असे टेंभुर्णीकर म्हणाले. देशाच्या एकूण जैवविविधतेत राज्यातील वनस्पतींसह, प्राणी,पक्षी यांच्या वाट्याबद्दल त्यांनी विस्तृत माहिती दिली. पश्चिमघाटातील जैवविविधता संवर्धनासाठी राज्याने उचलेली पावले, गवती कुरण, महाराष्ट्र जनूक बँक आदिंवरही त्यांनी प्रकाश टाकला. नागपूर जिल्ह्यातील विविध तलावांशेजारील जैवविविधतेचे संवर्धन होण्याच्यादृष्टीने जिल्हा परिषदेने वनविभागाच्या समन्वयाने कार्य करण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. मनपा आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी यांनी जैवविविधता ही मानवाला निसर्गाने दिलेली अमूल्य देणगी असल्याचे सांगत त्याच्या संवर्धणासाठी लोकसहभागाची गरज व्यक्त केली.

## विषबाधा

यवतमाळच्या आर्णी तालुक्यात दोन वेगवेगळ्या ठिकाणी बाधित मांस खाल्याने 19 जणांना विषबाधा झाली आहे. यात म्हसोबा तांडा इथं 16 जण तर अंजी इथल्या तिघांची प्रकृती बिघडली आहे, त्यांच्यावर आर्णी इथल्या ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू असून तिघां चिमुकल्याची प्रकृती चिंताजनक आहे. मांस खाल्ल्यानंतर उलटी, मळमळ असा त्रास झाल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं.

## विदर्भात उष्णतेचीलाट/ हवामान

विदर्भात उष्णतेची लाट कायम असून गेल्या २४ तासात अकोला इथं सर्वाधिक ४४ अंश सेल्सियस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. त्यापाठोपाठ अमरावती आणि वर्धा इथं ४३ अंशाच्या घरात तापमान होतं तर यवतमाळ, चंद्रपूर, बुलढाणा

आणि गडचिरोली इथं ४१ आणि ४२ अंशाच्या दरम्यान अंश तापमान होतं. नागपुरात ४० पूर्णांक ७ अंश सेल्सियस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली. नागपुरात चौका-चौकात ग्रीन शेड सह, ठीक ठिकाणी पाणपोई तसंच सरकारी रुग्णालायत उष्माघात कक्ष यासह सर्व जिल्हा प्रशासनानं विविध स्तरावर सज्जता ठेवली आहे. दरम्यान, आगामी काही तासात विदर्भातील नागपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती, चंद्रपूर, अकोला, वाशीम, भंडारा जिल्ह्यांतील काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, आणि हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.सध्या नागपुरात वादळी पर्जन्यमान असून हलक्या ते माध्यम पावसाळा सुरवात झाली आहे.

## महावितरण

नव्या तंत्रज्ञानाचे तसेच आर्थिक बचतीसोबतच विविध फायदे देणाऱ्या महावितरणच्या स्मार्ट प्रीपेड मीटरमुळे आता नगपूर परिमंडलांतर्गत असलेल्या नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील वीजग्राहक देखील स्मार्ट होणार आहे. हे स्मार्ट वीजमीटर लघुदाब घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक व इतर ग्राहकांकडे मोफत बसविण्याचे नियोजन महावितरणकडून पूर्णत्वास गेले आहे. नागपूर आणि वर्धा शहरातील महावितरणच्या कर्मचारी वसाहतींमध्ये ही स्मार्ट मीटर्स बसविण्यास सुरुवार झाली आहे. स्मार्ट मीटर्स, गेट-वे, डाटा सेंटर यातील माहिती आदान-प्रदान करण्याच्या प्रक्रीयेची चाचणी झाल्यानंतर ही मीटर्स शहरासह संपुर्ण नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील वीज ग्राहकांकडे ही स्मार्ट मीटर्स बसविण्यात येणार आहेत. केवळ महाराष्ट्रच नव्हे तर देशातील सर्वच राज्यांच्या वीजग्राहकांकडे स्मार्ट प्रिपेड मीटर लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानुसार महाराष्ट्रामध्ये महावितरणच्या सर्व लघुदाब वर्गवारीतील 2 कोटी 41 लाख वीजग्राहकांकडे हे स्मार्ट मीटर लावण्यात येणार आहे. मात्र यातून फक्त कृषिपंपांच्या वीजजोडण्यांना वगळण्यात आले आहे. मानवी हस्तक्षेपामुळे सध्याच्या मीटरचे रीडिंग चुकीचे येणे किंवा सरासरी किंवा चुकीचे वीजबिल येणे, बील दुरुस्तीसाठी कार्यालयात जावे लागणे आदी ग्राहकांच्या मनस्तापाचे प्रकार नव्या तंत्रज्ञानाच्या स्मार्ट मीटरमुळे संपूर्णतः बंद होतील. स्मार्ट मीटरचे मासिक बिल वेबसाईट व मोबाईल ॲपवर उपलब्ध राहील. त्याची आवश्यकतेनुसार ग्राहकांना प्रिंट काढता येईल.

*****